# ज्योतिर्मयी

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक २३ वा ❑ भारतीय सौर दिनांक ०७ फाल्गुन शके १९४७, गुरूवार दि.२६ फेब्रुवारी २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

# साहित्याचा इंद्रधनुषी अविष्कार - साहित्योत्सव

साहित्योत्सव

दिनांक २० फेब्रुवारी ते २२ फेब्रुवारी रोजी छत्रपती संभाजीनगरमध्ये भव्य आणि दिव्य स्वरूपामध्ये साहित्योत्सव संपन्न झाला. या साहित्योत्सवाबद्दल लिहिणार काय? काही कृती या शब्दांमध्ये मांडता येत नाहीत, त्या अनुभवाव्या लागतात. तसे या साहित्योत्सवामध्ये जे सहभागी झाले, त्यांनी तो अनुभवला त्यापैकी मी एक होय. मी जरा धाडसाने म्हणतोय, का? कारण बऱ्याचशा साहित्य संमेलनाला जायचा योग येतो, तिथे गेल्यानंतर लक्षात येतं की, साहित्याचे व्यापकपण, महत्त्व वर्णनापेक्षा आम्ही, मीच पुढे येतो. परंतु या ऊत्सवामध्ये आम्ही, मी कुठे दिसला नाही आणि न दिसल्यामुळे साहित्याचाच खऱ्या अर्थाने उत्सव झाला आणि तो प्रत्येकाने आपण अनुभवला.

या उत्सवाची सुरुवात क्रांती चौकातून ग्रंथदिंडी स्वरूपाने झाली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला मंत्री अतुल सावे, प्रसिद्ध साहित्यिक बाबा भांड, ज्येष्ठ समीक्षक डॉ. ऋषिकेश कांबळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विधीवत ग्रंथ पूजनाने हरिनामाच्या गजरात साहित्य उत्सवाला हर्षोल्हासात सुरुवात झाली. भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवत ग्रंथदिंडी महामानवांना अभिवादन, पुष्पहार अर्पण करत उत्सवाच्या ठिकाणी पोहोचली. ग्रंथांचे औक्षण करून त्या दिवशी गोदेचा वसा । शब्दांचा वारसा ।। ऐकण्याचा आनंद सर्वांनी घेतला. भोजन झाल्यानंतर वेळेनुसार सर्व निघून गेले, पण मला आठवतंय समितीतील काही दिग्गज मंडळी त्यामध्ये जिगे सर असतील त्या कार्यक्रमाच्या ठिकाणी असलेल्या काही त्रुटी दीड वाजेपर्यंत सोडविल्या.

दुसरा दिवस उद्घाटनाची पहाट घेऊन उजाडला. उद्घाटनासाठी आलेले सर्वच मान्यवर मा.ना.अतुल सावे, महापौर समीर राजुरकर आ. अनुराधा चव्हाण, अभिराम भडमकर आणि पुढच्या दोन दिवसांमध्ये लांबून आलेली आभाळाएवढी साहित्यिक मंडळी यांना आपण साक्षात ऐकलेलेच आहे ते काय म्हटले सांगत शब्दांची शृंखला लांबवित आपला वेळ घेणार नाही. महत्त्वाचं राज्यस्तरीय नाव देतात पण तिथे बोटावर मोजण्या एवढेच उपस्थित असतात. परंतु या उत्सवाकडे बारकाईने पाहिलं तर आपल्या लक्षात येईल की, बाकीच्या ठिकाणी जेवढ्या प्रमाणात श्रोते असतात तेवढ्या प्रमाणात आभाळाएवढ्या उंचीचे वक्ते या उत्सवाला लाभले होते. आणि ते सर्व आयोजक समितीच्या कष्टाने प्रेमाने उपलब्ध झालेले आपणा सर्वांना जाणवले.

जागर प्रतिभेचा..युवा मनाचा या स्लोगननुसार महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेले युवा कवी, कवित्रींना एक राज्यस्तरीय व्यासपीठ उपलब्ध झाले. आमच्यासारख्या संशोधकांना साहित्याकडे पाहण्याचा, जाणण्याचा, विचार करण्याचा, अनुभवण्याचा नवीन दृष्टिकोन मिळाला..! खरंतर हा आम्हाला सगळा साहित्योत्सवाचा अनुभव माझे मार्गदर्शक, गुरुवर्य प्रा. डॉ.सर्जेराव जिगे सर यांच्यामुळे मिळाला. सरांनी फोन केला तुम्हाला यावे लागतंय, विद्यार्थी, दिंडी अन्य काही नियोजन आम्हा विद्यार्थ्यांवर सोपवली. सरांबद्दल मत व्यक्त करत असताना त्यांना ते आवडणार नाही (मी लहान तोंडी मोठा घास घेतोय) सरांना मानपान आवडत नाही. वस्तुस्थितीनुसार सरांची वाटचाल असते. आम्ही साठ-सत्तर टक्के विद्यार्थी सरांच्या प्रेमापोटी आलो. पण जी काही आभाळाएवढ्या उंचीची व्यक्तिमत्व होती भडकमकर सर, वकील सर आदी वक्त्यांनी सरांबद्दल वस्तुस्थिती प्रतिपादन केली. महत्त्वाचं नाव घ्यावं वाटतं ते म्हणजे इंद्रजीत देशमुख सर महाराष्ट्रातील प्रसिद्ध व्याख्याते, वक्ते ज्यांचं वक्तृत्व ऐकण्यासाठी हजारोंच्या संख्येने गर्दी होते, त्यांची तारीख लवकर भेटत नाही व्याख्यानाच्या शेवटी बोलत असताना ते म्हटले माझ्याकडे वेळ नव्हता आणि एवढ्या लांबून प्रवास करून आलो ते फक्त जिगे सरांच्या प्रेमामुळे. ही सरांच्या प्रेमाची, व्यक्तिमत्त्वाची पावती आहे. आणि या प्रेमामुळेच मोठमोठ्या वक्त्यांचे साहित्यिक श्रवण करायला भेटले.

✍ नारायण दमाले,
आळंदी मो. 98227 03027

सूत्रसंचालन फक्त स्टेजवरच असतं असं नाही, तर स्टेजच्या खाली राहून संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सर करत होते. याला तुम्ही-आम्ही साक्षी आहोत. सुरुवातीला उल्लेख केल्याप्रमाणे दीड वाजेपर्यंत थांबून कमी-जास्त पाहण हा खरा नेतृत्वाचा गुण! आलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला विचारणं जेवण केलं का? राहण्याची सोय चांगली आहे ना? आलेला प्रत्येक वक्ता सरांना भेटल्याशिवाय जात नव्हता सर काहीतरी कामांमध्ये होते, एक मोठे साहित्यिक आहेत त्यांचं नाव नाही घेत. ते सरांना भेटण्यासाठी एक तास थांबले हा सरांचा सगळ्यात मिळून मिसळून राहण्याचा गुण आहे. रात्री कार्यक्रम संपल्यानंतर श्रोते, वक्ते गेल्याच्या नंतर सर सगळ्यांच्या शेवटी जायचे.

साहित्योत्सवाचा समारोप होत असताना डॉ. बाळकृष्ण कवठेकर यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करताना कवठेकर सर बोलत होते सर्जेराव हा माझाच विद्यार्थी आहे. आम्ही शेवटच्या रांगेत बसलो होतो. आमच्या पाठीमागे बाहेरून आलेली दोन तीन प्राध्यापक मंडळी बसलेली होती. कवठेकर सर बोलत असताना त्यांच्यातील एक जणांनी विचारलं जिगे सर कोणते आहेत. दोन्हींनी बरोबरच उत्तर दिली स्टेजवर पहिल्या रांगेत शेवटच्या चेअर्सवर जे बसलेतना ते आहेत. ते आहेत का? आश्चर्यचकित होऊन प्राध्यापक बोलले ते तर पूर्ण नियोजन करत होते. स्टेजवर असताना सुद्धा शेवटच्या खुर्चीवर बसले ग्रेट सर आहेत. त्यांना उत्तर देताना दुसऱ्या प्राध्यापकांचे वाक्य खूप आवडले ते म्हटले मोठी माणसं तीच मोठी असतात जे दुसऱ्याला मोठं करतात आणि मानपानाच्या वेळेस बाजूला होतात. या वाक्याने मला एक समजलं सर सहज आपल्या कर्तव्य कर्मातून प्रत्येकाच्या हृदयात घर करतात. हे त्यांच्याबद्दल लिहिलेलं त्यांना अजिबातच आवडणार नाही पण जी वस्तुस्थिती आहे, या तीन दिवसाच्या उत्सवामध्ये आपण सर्वांनी अनुभवलेली आहे. असे साहित्योत्सव साहित्यासाठीच घडत राहो अशी मनोकामना व्यक्त करतो. सर्व आयोजक समितीचे धन्यवाद, आभार.

# बेवारस मृतदेहांचा गंभीर प्रश्न


प्रा.डॉ.सुधीर अग्रवाल
वर्धा


बेवारस मृतदेहांचा प्रश्न अत्यंत गंभीर असून, देशभरातील शवागारांमध्ये हजारो मृतदेह अंत्यसंस्काराविना पडून आहेत. रेल्वे, नद्या व रस्त्यांवर आढळणाऱ्या या मृतदेहांची ओळख पटवणे आणि सन्मानपूर्वक अंत्यसंस्कार करणे हे मोठे आव्हान आहे. पोलीस तपास व नातेवाइकांचा शोध घेण्यातील दिरंगाई, तसेच सामाजिक संवेदनशीलता कमी झाल्यामुळे या समस्येत भर पडत आहे.

देशभरात ३५ हजारांहून अधिक बेवारस मृतदेह अंत्यसंस्काराविना पडून असल्याचे वृत्त आहे. अनेकदा मृतदेहांची ओळख पटत नाही, त्यामुळे पोलीस या मृतदेहांची नोंद बेवारस म्हणून करतात. एकट्या मुंबईत १०७ बेवारस मृतदेह अंत्यसंस्काराची वाट बघत आहेत. बेवारस मृतदेहांचा अंत्यविधी हा केवळ एक सामाजिक उपक्रम नसून तो मानवी हक्कांचा एक महत्त्वाचा भाग आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम २१ अंतर्गत सन्मानाने जगण्याच्या अधिकारासोबतच मृतदेहावर सन्मानाने अंत्यविधी होण्याचा अधिकारही सर्वोच्च न्यायालयाने मान्य केला आहे. सामाजिक आणि कायदेशीर बाब ही फार मोठी अडचण असते. मृत्यूनंतर सन्मान मिळणे हा मानवी अधिकार आहे. सर्वोच्च न्यायालयाने बेवारस मृतदेहांवर सन्मानपूर्वक अंत्यसंस्कार करण्याचे धोरण आखण्याचे आदेश दिले आहेत, तरीही अंमलबजावणीत त्रुटी आहेत.

रेल्वे अपघात, बसस्थानके, नद्यांचे किनारे अशा ठिकाणी अनेक मृतदेह मिळून येतात. काही व्यक्ती आणि संस्था जसे की, अनिल डागर, नयना दिवेकर, आणि मुस्तफा मुजावर यांनी स्वतःहून पुढाकार घेऊन अशा मृतदेहांवर अंत्यसंस्कार करण्याचे कौतुकास्पद कार्य केले आहे.

यूआवश्यक उपाययोजना:

फास्टट्रॅक तपास: बेवारस मृतदेहांची ओळख पटवण्यासाठी जलद तपास यंत्रणा.

डिजिटल डेटाबेस: देशभरातील सर्व बेवारस मृतदेहांचा डिजिटल डेटाबेस तयार करणे.

सामाजिक संस्थांचा सहभाग: स्वयंसेवी संस्थांना अंत्यसंस्कारासाठी कायदेशीर पाठबळ देणे.

जागरूकता: हरवलेल्या व्यक्तींबाबत पोलिसांना त्वरित माहिती देण्याबाबत जागरूकता निर्माण करणे.

बेवारस मृतदेहांची समस्या केवळ पोलिसांची नसून ती मानवी संवेदनांशी संबंधित आहे, त्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज आहे.

दिल्लीत पूजा शर्मा बेवारस मृतदेहांवर अंत्यसंस्कार करण्यासाठी दिल्लीत एक अशासकीय संस्था (एनजीओ) चालवतात. शहरातील हॉस्पिटल्स आणि पोलिसांच्या मदतीने त्यांना बेवारस मृतदेहांची माहिती मिळते, यासाठी त्या सतत त्यांच्या संपर्कात असतात. आणि अशा पद्धतीने जिथे गरज असेल तिथे त्या त्यांची रुग्णवाहिका घेऊन हजर होतात.२७ वर्षांच्या पूजा शर्मा यांच्या मते, त्यांनी अशाच प्रकारे सुमारे पाच हजार बेवारस मृतदेहांवर अंत्यसंस्कार केले आहेत. शहराच्या वेगवेगळ्या भागांमध्ये सापडलेल्या या बेवारस मृतदेहांची ओळख पटवायला कोणताही नातेवाईक किंवा वारस आलेला नसतो.

पूजा शर्मा म्हणतात की, किमान मृत्यूनंतर तरी या बेवारस मृतदेहांना सन्मान मिळावा, त्यांची कदर केली जावी, यासाठी त्या हे काम करतात.हिंदू धर्मात अशी परंपरा आहे की, मृत्यूनंतर केवळ पुरुषच मृतदेहावर अंत्यसंस्कार करू शकतात. पूजा यांनी ही प्रथा मोडीत काढली.पूजा म्हणतात, ''मी वाचायला सुरुवात केली. मी वेद वाचले, धर्मग्रंथ वाचले आणि इतर धर्मांची पुस्तकेही वाचली. ती पुस्तके वाचल्यानंतर मला कळले की, महिला अंत्यसंस्कार करू शकत नाही, असं कुठेही लिहिलेलं नाही.'' पारंपरिक रितीरिवाजाना बगल देत पूजा यांनी या रूढ प्रथा मोडीत काढून पुरुषांना लाजवेल अशी कामगिरी करत असून मानवी संवेदना जपत आहे.

बेवारस मृतदेहांवर सन्मानपूर्वक अंत्यसंस्कार करणे ही मानवी कर्तव्य आणि सामाजिक जबाबदारी आहे. पोलीस ओळख पटवण्याचा प्रयत्न करतात आणि त्यानंतर स्वयंसेवी संस्थांच्या (उदा. ममदानी ट्रस्ट, आर्यन युवा फाउंडेशन) मदतीने धार्मिक विधीनुसार अंत्यविधी केले जातात. असे उपक्रम मृतदेहाला प्रतिष्ठा मिळवून देतात आणि सामाजिक जाणिवेतून काम करतात.

मृत्यू नंतरही शरीराला सन्मान आणि आत्मिक शांती मिळावी, तसेच शहरातील दुर्गंधी व संसर्ग टाळण्यासाठी ही नितांत गरज आहे. अनेकजण पुढाकार घेऊन अशा मृतांच्या अंत्यसंस्कारासाठी आर्थिक आणि शारीरिक मदत करतात.अशा प्रकारे, बेवारस मृतदेहांच्या अंत्यसंस्काराची गरज ही केवळ सामाजिक नाही, तर ती एक सर्वोच्च मानवी भावना आहे.

## जात्यावरच्या ओव्या.....

झाड आंब्याच झाड
वळखण ठेसणाची
मोटारगाडी थांबवा
वाट सांगे माहेराची ||५१६||

झाड आंब्याच झाड
बापजीन वाढवल
झोळी बांधली फांदीला
बाळ माझ गं निजल ||५१७||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनाचे श्लोक – एक सार्वकालिक मनोपनिषद




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

**ज्योतिर्मय साहित्य**

समर्थ श्रीगणेशाला ''सर्वा गुणांचा ईश'' म्हणतात. येथे केवळ सत्त्व, रज, तम हे त्रिगुण अभिप्रेत नाहीत, तर चांगले-वाईट, त्याज्य-ग्राह्य असे सर्व गुण येतात. मुळात सृष्टीत कोणतीही गोष्ट स्वतःहून चांगली किंवा वाईट नसते; तिचा उपयोग आपण कसा करतो, यावर तिचे स्वरूप ठरते. अग्नी स्वयंपाकासाठीही उपयोगी पडतो आणि जाळण्यासाठीही. शस्त्र एखाद्याला जखमी करू शकते, तसेच शस्त्रक्रियेतून प्राण वाचवूही शकते. दैनंदिन व्यवहारात त्याज्य मानले जाणारे विष अनेक रोगांमध्ये औषध ठरते. सृष्टीत शुद्ध तत्त्वच विराजमान आहे आणि त्या तत्त्वांचा अधिपती गणपती आहे.

गणेशवंदनेनंतर समर्थ विद्येची देवता असलेल्या शारदेचे-सरस्वतीचे-स्मरण करतात. ''नमू'' हा शब्द गणेश आणि शारदा या दोघांनाही उद्देशून आहे. दैनंदिन जीवनात असो वा अध्यात्ममार्गावर, प्रगतीसाठी ज्ञान अत्यावश्यक आहे; आणि ज्ञानाची अधिष्ठात्री देवता म्हणजे शारदा. तिच्या कृपेअभावी कोणतेही ज्ञान संपादन शक्य नाही.

शब्दाचे मूळ स्फुरण परा, त्याचा भावार्थ पश्यंती, त्याचा नाद मध्यमा आणि प्रत्यक्ष उच्चार वैखरीया चारही वाणींचे मूलस्थान शारदा आहे. कोणत्याही वाङ्मयाची, विचारांची किंवा अभिव्यक्तीची निर्मिती तिच्याशिवाय शक्य नाही. म्हणूनच समर्थांनी या मनोपनिषदाच्या प्रारंभी शारदेला वंदन केले आहे. शारदाच आदिमाया, आदिशक्ती आहे.

या वंदनाचा हेतू स्पष्ट आहे-आपली ही वाटचाल निर्विघ्नपणे पार पडावी. आपल्याला ज्या मार्गावर चालायचे आहे, तो मार्ग म्हणजे श्रीरामांचा मार्ग. येथे श्रीराम म्हणजे केवळ दशरथपुत्र नव्हे, तर परमात्मस्वरूप. हा मार्ग अनंत आहे, न संपणारा आहे. या मार्गावर स्वयं भगवान शंकरही चालत आहेत; तेही अखंड रामनामाचा जप करत आहेत.

समर्थांचे दैवतच श्रीराम आहे. ते स्वतःला रामदास म्हणतात-रामाचे दास. श्रीराम जणू त्यांना प्रत्यक्ष समोर उभे दिसतात. म्हणूनच ते म्हणतात, ''गमू पंथ अनंत या राघवाचा.'' या अनंत मार्गावर चालण्यासाठी समर्थ श्रीगणेश आणि शारदेचे आशीर्वाद मागतात-आणि ते आशीर्वाद आपल्यासाठीही आहेत.

आपणही भक्तिभावाने त्यांना वंदन करून, या राघवाच्या अनंत मार्गावर चालण्यासाठी सज्ज होऊ या.

स्वसंवाद

कोणत्याही कार्याची सुरुवात करताना माझ्या मनात मंगलभाव आहे का, की केवळ घाई?

माझ्यातील गुणांचा उपयोग मी साधनेसाठी करतो की बंधनांसाठी?

शब्दांच्या पलीकडे जाऊन त्यामागील भाव आणि अर्थ समजून घेण्याचा मी प्रयत्न करतो का?

श्रीरामांचा ''अनंत मार्ग'' हा माझ्यासाठी बाहेरचा आहे की अंतर्मनातून सुरू होणारा?

***






## दासबोध स्तवन

उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# श्रवणनिरूपण

**ज्योतिर्मय साहित्य**

जे दुष्ट आहेत दुराग्रही आहेत. ते ते श्रवणाचा निदिध्यास घेऊन, पुण्यात्मे बनले आहेत. एवढा महान, थोर बदल वाईट लोकांच्यात श्रवणाने होतो. श्रवणाने चित्तशुद्धी घडते, लोभ रहात नाही. ज्ञानाची आवड निर्माण होते. आपण समाजासाठी काही तरी केलं पाहिजे ही धारणा मनामध्ये निर्माण होते. अनेक व्याधी रोग बरे होतात. परमात्म्याच्या मनात जर तुम्ही ठासून भरला असाल तर तो तुम्हाला एवढं भरभरून दान तुमच्या पदरात टाकेल की तुम्हाला मागायला तो काही शिल्लकचं ठेवणार नाही. परमात्म स्वरूपाचा साक्षात्कार झाल्याने देव स्वरूप कधी झालो ते समजतही नाही. एवढं भरभरून पदरात दान पडते.

श्रवणनाम समासाच्या शेवटाकडे आपण आलो आहोत.

संपूर्ण समाजाचा अभ्यास केला तर काय शिकलो ?

मित्रांनो सतत चांगलं वाचा, कानावर सतत उच्च विचार पडू द्या, श्रवण, मनन, पूजन करत असताना सतत सात्विकता जोपासा. जसा विचार करू तसे आजूबाजूला असणाऱ्या घटना घडत असतात हे जर खरे आहे तर सतत सत्संगती रहावे चांगले विचार कानावर पडण्यासाठी भजन, पूजन, निरूपण, किर्तन ऐकावे. सतत सन्मार्गाच्या रस्त्यावर चालावे.

(क्रमशः)



## श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

# भगवंताच्या प्राप्तीसाठीच जन्माला आला आहे

**ज्योतिर्मय साहित्य**

भगवंत एकच ओळखतो : जो त्याची भक्ती करतो, तो त्याला आवडतो. तिथे जातीचे, वर्णाचे बंधन नाही. आपण भाग्यवान कुणाला म्हणतो ? ज्याच्याजवळ पैसा अधिक असतो त्याला; पण तो काही खरा भाग्यवान नव्हे. ज्याला भगवंत भेटला तो खरा भाग्यवान. भगवंत आपल्याला भेटणे हे प्रत्येकाने जीवनातले मुख्य कार्य समजावे. पैसा भगवंताच्या आड येत नसतो; आपला अहंकार, मीपणा, हाच मुख्यत: भगवंताच्या आड येतो. ' मी सेवा करतो ' असे जो म्हणतो त्याची खरी सेवाच होत नाही. कर्ते पणा आपल्याकडे घेतो तोपर्यंत सेवा नाही घडली. भगवंताची आठवण ठेवून जे जे कर्म आपण करतो ते ते पुण्यकर्म होते. भगवंत माझ्याजवळच आहे अशी श्रद्धा ठेवून वागा. श्रद्धेने जो करील त्याला फळ येईल खास. पण म्हणून श्रद्धेवांचून केलेले भजनपूजन वाया जाते असे नाही समजू. भगवंताची भक्ती उत्पन्न व्हावी म्हणूनच भजनपूजन करावे, मनाचे रंजन म्हणून करू नये. सत्कर्म करणारे पुष्कळ असतात, पण पुष्कळ वेळा त्यात स्वार्थबुद्धी असते. फळाची आशा न ठेवता सत्कर्म करणे हीच खरी भक्ती.

सर्वांभूती भगवद्भाव ठेवावा हेच परमार्थाचे खरे सार आहे. माझ्यामध्ये भगवंत आहे हे मी ओळखले म्हणजे इतरांच्या ठिकाणी त्याला पाहता येईल. ' मी कोण ' हे न ओळखल्यामुळेच आपले सर्व चुकते आहे. माझ्यात भगवंत आहे हे दोन प्रकारे पाहता येते. सर्व चेतना त्याच्याकडून मिळते हे एक. दुसरे म्हणजे, ' देह ठेवला ' असे जेव्हा आपण म्हणतो, तेव्हा ठेवणारा कोणी दुसरा असला पाहिजे; म्हणजे देह हा ' मी ' नव्हे. जागृती, स्वप्न, सुषुप्ती यांचा साक्षी कुणीतरी आहे हे खास. ' मी कोण ' हे जाणायला साक्षीरूपाने वागावे. सर्व जगाला मी माझे म्हणतो, पण जो खरा माझा त्याला तसे म्हणत नाही. भगवंत माझ्यात आहे ही जाणीव उत्पन्न करून घ्यावी. अनुमानाने आणि अनुभवाने पाहिले तर भगवंत माझ्यात आहे हे खात्रीने पटेल. वर्षाचा आनंद पाडव्यापासून, आयुष्याचा आनंद वाढदिवसापासून, आणि दिवसाचा आनंद सकाळपासून सुरू होतो, म्हणून भगवंताच्या भक्तीला आपण त्याच्या नामाने सुरुवात करावी; म्हणजे त्यामुळे होणारा आनंद लगेच आपल्याला मिळेल; सुरुवात गोड आणि शेवटही गोडच होईल. आकाश हे जसे सर्वांना सारखे आहे, त्याचप्रमाणे मानवजन्माचे ध्येय हे सर्वांना सारखेच आणि एकच आहे. कोणत्याही जातीतला, धर्मातला किंवा देशातला मनुष्य असो, तो भगवंताच्या प्राप्तीसाठी म्हणजे परमार्थासाठीच जन्माला आला आहे.

आपण भगवंताला शरण गेलो, तर तो आपल्याला हातचा कधी सोडणार नाही.

***

## श्री क्षेत्र नैमिष्यारण्य भागवत कथा व हरिनाम सप्ताह

भागवत कथाकार :
आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर
कथेचे श्रवण करताना धावते संकलन
मधुकर बोरीकर 9403061886

### दिवस दुसरा

पुढे.....
नंद बाबा गावातील लोकांना पंडिताचे दर्शन घेण्यासाठी बोलवायला गेले. इकडे पंडित एकटा आहे असे पाहून भगवान रांगत रांगत त्याचे जवळ गेले. त्यांनी त्याला विचारले, तुम्ही कोण? मी काशीला असतो. ते तुमचे गाव झाले. तू कोण? मी राम शास्त्री.
ते देहाचे नाव झाले, तू कोण?
मी मोठा शास्त्री. ही तुझी विद्या झाली, तू कोण ?
तो निरुत्तर झाला. मग भगवान त्याला म्हणाले, तू आधी मी कोण हे जाणून ये मग मी कोण हे विचार.
मी करणारा नाही, हे एकदा कळले की,
ममता,अहंता जाते. मग बंधन रहात नाही.प्रल्हाद आपले सर्व कर्तृत्व भगवंताला देतात.
तुका म्हणे तुमच्या कृपेचे हे देणे..
माऊली ज्ञानेश्वरी लिहूनही त्याचे श्रेय घेत नाहीत.
नुसते ज्ञान हे आत्मज्ञान साठी उपयुक्त असेल पण समाजाच्या कल्याणासाठी त्याला भक्तीची जोड असावी लागते.
भागवत आम्हाला हे कळावे साठी कथा येतात.
भागवत भक्ती शिवाय मानवी जीवनाची परिपूर्णता नाही.सातव्या अध्यायात माऊलींनी ज्ञानी भक्त असे वेगळे लिहिले आहे.
भक्ताच्या कथा हे कळावे म्हणून आहेत.
संतांच्या जीवनात जेव्हढा अडचणी आल्या त्याच्या शतांशाने देखील अडचणी आपल्या जीवनात येत नाहीत.अशी संकटे येऊन ते दोलायमान झाले नाहीत.
योग वसिष्ठ आपणास सांगते...
आपल्या जीवनात विचार असावेत.
विचार समुद्रा सारखा गंभीर असावा म्हणजे विचारांना खोली असावी.तो मेरू पर्वता सारखा स्थिर असावा. तो चंद्रा प्रमाणे शीतल असावा.असा विचार करायला भागवत शिकविते.
वारीत गेलो तर अडचणी येतील तर येऊ द्या. मेलो तर मेलो..
हा स्थिर विचार. क्रमश :.....

# तोतरेपणा म्हणजे काय आणि त्यामागची कारणे ?

**ज्योतिर्मय साहित्य**

तोतरेपणा म्हणजे बोलताना अडखळणे. अशा स्थितीत लोक इतर लोकांप्रमाणे अस्खलीत, न अडखळता बोलू शकत नाहीत. कधी-कधी बोलताना तोतरे असणारे लोक गाताना मात्र अडखळत नाहीत. त्यामुळे तोतरेपणा बोलताना आहे की गाताना हे समजून घेतले पाहिजे. ९८ टक्के लोक बोलतानाच तोतरे असतात.

तोतरेपणा हा प्रत्येक व्यक्तीप्रमाणे वेगळा असतो.

त्याची काही कारणे पुढीलप्रमाणे –

अनुवांशिक –

कधी-कधी तोतरेपणा हा पालकांकडून त्यांच्या जिन्सद्वारे मुलांकडे येतो.

अनुकरण–

लहान मुलांनी इतरांचे अनुकरण केल्यानेही ही समस्या उद्भवते. एखाद्या मुलाने तोतऱ्या व्यक्तीची नक्कल किंवा अनुकरण केले तर कालांतराने ते मूलही तोतरे बोलण्याची शक्यता असते.

तणाव–

मानसिक तणावामुळेही बोलण्यात दोष निर्माण होऊ शकतो आणि बऱ्याचदा मुलाखतीच्या वेळी तणावामुळे व्यक्ती अडखळत बोलते.

न्यूरोलॉजिकल समस्या –

कधी-कधी अपघाताने मेंदूला दुखापत होते. परिणामी मेंदूतील बोलण्यासाठीच्या असलेल्या केंद्रात बिघाड होतो. त्यामुळे वाणी दोष उत्पन्न होतो.

न्युनत्वाची भावना–

मनात न्युनत्वाची भावना असेल तर अशा प्रकारची बोलण्यातील समस्या निर्माण होते. समजा मुलाची त्याच्या वर्गमित्रांनी सारखी चेष्टा केली किंवा पालक आणि शिक्षक मुलावर वारंवार ओरडले तर मुलाच्या मनात भीती येते आणि मग तो अडखळत बोलू लागतो.

कुठल्या वयात येतो तोतरेपणा ?

ही समस्या बऱ्याचदा लहानपणी किंवा पौगंडावस्थेत निर्माण होते.'साधारण अडीच ते चार वर्षातली मुले भाषा आत्मसात करत असताना अडखळतात. ते सर्वसामान्य असते. पालकांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की या वयातील मुलांवर स्पष्ट बोलण्याची जबरदस्ती करू नये. हे अडखळणे आपोआप जाते. पण ही समस्या ४ वर्षानंतरही राहिली तर मात्र पालकांनी वाणी तज्ज्ञांचा सल्ला घ्यायला उशीर करू नये.'

हे समजून घेणे गरजेचे आहे की, लहानपणी बोलण्यातील दोष दूर केला नाही तर पुढे जाऊन त्यावर उपचार करणे कठीण जाते. थोडे का होईना तोतरेपणा हा राहतोच. म्हणूनच हा दोष लवकर ओळखणे आणि त्यावर उपचार करणे आवश्यक आहे.

नक्की या समस्येत काय होते ?

साधारण लोक सुरुवातीच्या अक्षरावरच अडखळतात. उदाहरणार्थ, पुन्हा पुन्हा तोच शब्द उच्चारणे प प प प प पेन, प्रदीर्घ उच्चार म.....दर. बोलताना मधेच बराच वेळ थांबणे मी पुस्तक.... ( बराच वेळ थांबणे ) वाचत आहे. पुन्हा पुन्हा तोच शब्द बोलणे मी...मी....मी अभ्यास करत आहे. बोलताना शब्द किंवा वाक्याच्यामध्ये आवाज काढणे, मी (अंअंअंअं) खेळायला (अंअंअंअं) जात आहे.

म्हणूनच बोलण्यातील दोष लहानपणीच कळला तर त्यावर योग्य स्पिच थेरपी घेऊन तो पूर्णपणे जाऊ शकतो. याला उशीर झाला तर मात्र, आयुष्यभर या समस्येला तोंड द्यावे लागेल. याशिवाय सर्वसाधारण व्यक्तींना तोतरेपणाबद्दल माहिती हवी आणि तोतरे बोलणाऱ्यांची थट्टा कोणी करू नये. किंवा त्या व्यक्तीकडे दुर्लक्षही करू नये. त्यांना समानतेची वागणूक द्यावी. शिवाय तोतरे बोलणाऱ्याला संवादासाठी प्रोत्साहन द्यावे आणि अडखळत बोलणाऱ्याचे संयतपणे ऐकून घ्यावे.

***

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

# समरसतेचा युगपुरुष पद्मश्री गिरीश प्रभुणे काका

**ज्योतिर्मय साहित्य**

आमच्या श्रीभगवती सेवा आश्रम व मनाचे श्लोक परिवार या कार्यपरिवारातील एक सच्चे, निष्ठावंत कार्यकर्ते श्री. सुधीरजी आलकरी यांच्या पूर्वपरिचयामुळे तसेच गिरीधरभाई राठी व श्री. आलकरी यांच्यासह बुधवार, दिनांक ११/२/२०२६ रोजी सायंकाळी आम्हाला पद्मश्री गिरीश प्रभुणे काका यांच्या कार्यभूमीला भेट देण्याचा योग आला.

ही भेट पुनरुत्थान समरसता गुरुकुलम्, चिंचवड येथे, क्रांतीवीर चाफेकर विद्यालयाच्या पवित्र कर्मभूमीत घडलीआणि ती केवळ भेट न राहता आमच्या अंतर्मनावर कोरली गेलेली एक संस्कारयात्रा ठरली.

गिरीश काकांना सामाजिक कार्यासाठी भारत सरकारचा अत्यंत मानाचा चौथा नागरी सन्मान 'पद्मश्री' हा २०२१ साली प्रदान करण्यात आला आहे. याशिवाय राज्यस्तरीय व राष्ट्रीय पातळीवरील अनेक पुरस्कारांनी त्यांच्या कार्याचा गौरव झाला आहे. सामाजिक कार्यासोबतच त्यांनी मराठी साहित्यात विपुल लेखन, स्तंभलेखन तसेच प्रथा-परंपरा व संस्कृती यांवर अभ्यासपूर्ण लिखाण केले आहे.

बांबूपासून उभारलेल्या कुटीया, संग्रहित वस्तू, मूर्ती, तसेच सामाजिक व साहित्यिक क्षेत्रातील पुरस्कारांनी नटलेले गिरीश काकांचे साधे पण तेजस्वी कार्यालय पाहून मन स्तब्ध झाले. खादीचा झब्बा परिधान करून बसलेले गिरीश काकाक्षणभर एखाद्या ऋषीप्रमाणे भासले. प्राथमिक परिचयानंतर आम्ही मनाचे श्लोक या पुस्तिकांचे गुरुकुलममधील स्नातकांना वितरण केले व मनाच्या श्लोकांचा प्रचार कसा करावा, याबाबत त्यांचे अमूल्य मार्गदर्शन लाभले.

या गुरुकुलममध्ये सुमारे ३५० भटके, विमुक्त, अनाथ व तथाकथित गुन्हेगारी जमातीतील विद्यार्थी-विद्यार्थिनी निवासी स्वरूपात शिक्षण घेत आहेत. त्यापैकी अफरिदा शमशोद्दीन अन्सारी व भारती नरेंद्र काळे या दोघींनी मनाचे श्लोक, करुणाष्टक मुखोद्गत सादर केले. यासोबतच कठोपनिषद व त्यांनी वाचलेल्या पुस्तकांवरील समीक्षाही अत्यंत आत्मविश्वासाने मांडली. अवघ्या १२-१३ वर्षांच्या या कन्यांनी आम्हा तिघांनाही अचंबित केले. समाजाने नाकारलेली ही अपत्येच उद्याची खरी भारतीय संस्कृतीची ध्वजवाहक आहेत, याची प्रचिती त्या क्षणी आली.

गिरीश काका प्रसिद्धीविन्मुख असल्याने त्यांच्या कार्याची माहिती असलेली पुस्तिका देण्यास त्यांनी नकार दिला; मात्र माझ्या विनंतीवरून श्री. रविंद्र गोळे लिखित ''गिरीश प्रभुणे जसे कळले तसे'' हे त्यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त प्रकाशित पुस्तक त्यांनी भेट म्हणून दिले.

गिरीश काकांचे शालेय शिक्षण लोणंद, जि. सातारा येथे झाले. त्यांच्या कार्याची सुरुवात संघशाखेतून झाली. सिरूर तालुक्यातील निमगाव म्हाळुंगी येथे बौद्ध बांधवांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी जोडण्या साठी भीमगीतांच्या माध्यमातून शाखा सुरू करून त्यांनी सर्वांना आपलेसे केले. राष्ट्रभक्ती, स्वयंशिस्त, परोपकार आणि नि:स्वार्थी सेवा यांचे संस्कार उपेक्षित समाजातील मुलांमध्ये रुजवण्याचे कार्य त्यांनी अत्यंत सन्मानाने केले.

पारधी व इतर भटक्या जमातीं वर असलेला गुन्हेगारीचा अन्यायकारक शिक्का पुसून त्यांना सन्मानाचे जीवन मिळवून देण्याचे अलौकिक कार्य गिरीश काकांनी केले आहे. केवळ पुस्तकी शिक्षण न देता कौशल्याधारित शिक्षणावर त्यांनी भर दिला.

विशेषतः यमगरवाडी, ता. तुळजापूर, जि. धाराशिव येथे १९९३ पासून सुरू असलेला त्यांचा प्रकल्प सामाजिक समरसतेचा दीपस्तंभ आहे. भटके-विमुक्त विकास प्रतिष्ठानच्या माध्यमातून सुरुवातीच्या २५ मुलांपासून सुरू झालेले हे कार्य आज शेकडो मुलांच्या आयुष्याला दिशा देत आहे. पारंपरिक कौशल्येशिकार, वनऔषधी, वृक्षज्ञानयांना आधुनिक कृषितंत्रज्ञान, आयुर्वेद, हस्तकला व तंत्रज्ञानाची जोड देण्यात आली आहे.

पोलीस अत्याचार, बनावट केसेस यांविरोधात गिरीश काकांनी न्यायालयीन लढे दिले व यशस्वी केले. रेशन कार्ड, मतदार ओळखपत्र, आधार कार्ड यांद्वारे ''आपणही या देशाचे नागरिक आहोत'' हा आत्मसन्मान त्यांनी या समाजात जागवला. म्हणूनच यमगरवाडी म्हणजे सामाजिक समरसतेची जिवंत प्रयोगशाळा आहे.

चिंचवड येथील गुरुकुलमला जोडून भारतीय गोवंश संवर्धन प्रकल्पही राबवला जातो. गीर गाय वंश, गोपालनाचे मुक्त व बंधिस्त प्रयोग, पशुखाद्य व वैरण व्यवस्थापन, तसेच प्राप्त दूध निवासी मुलांच्या संगोपनासाठी वापरण्याची व्यवस्था पाहून समाधान वाटले.

मनाचे श्लोक परिवारासाठी पद्मश्री गिरीश प्रभुणे हे केवळ व्यक्ती नाहीत ते एक युगपुरुष आहेत. त्यांचे मार्गदर्शन व आशीर्वाद आमच्या स्मृतीपटलावर कायमस्वरूपी कोरले गेले आहेत.




# नाशिक शहरात उद्यापासून चौथे विश्व मराठी संमेलन

## नाव नोंदणीसाठी ऑनलाइन लिंक उपलब्ध

**ज्योतिर्मय साहित्य**

नाशिक - नाशिक येथे २७ व २८ फेब्रुवारी ते १ मार्च २०२६ या कालावधीत मराठा विद्याप्रसारक समाजाच्या केटीएचएम महाविद्यालयाच्या प्रांगणात चौथे विश्व मराठी संमेलन होत आहे. या संमेलनात सहभागी होण्यासाठी संयोजकांनी ऑनलाइन लिंक उपलब्ध करून दिली असून नाव नोंदणीसाठी इच्छुकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे, अशी माहिती संयोजकांनी दिली आहे.

विश्व मराठी संमेलन २०२६ नाशिक
२६ फेब्रुवारी ते १ मार्च
कुसुमाग्रज नगरी
म.वि.प्र.समाज संस्थेचे के.टी.एच.एम.महाविद्यालय, नाशिक

चौथ्या विश्व मराठी संमेलनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यासाठी कविवर्य कुसुमाग्रज नगरीत विविध मंच उभारण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर मराठी भाषा विभागाने देश- विदेशातून येणाऱ्या मराठी भाषिक प्रेमींना नाव नोंदणीसाठी ऑनलाइन लिंक https://vishwamarathisammelan.com उपलब्ध करून दिली आहे. या लिंकवर जाऊन इच्छुक नाव नोंदणी करू शकतात. जास्तीत जास्त नागरिकांनी नाव नोंदणी करावी, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# मोहितेमळा शाळेत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

**ज्योतिर्मय साहित्य**

जिल्हा परिषद शाळा मोहिते मळा (चितळी) मध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त लेखक आपल्या भेटीला हा उपक्रम राबविण्यात आला. ज्येष्ठ लेखक श्री. सोपानराव शिंदे साहेब यांनी मराठी भाषा संवर्धन व लेखन या विषयावर विद्यार्थ्यांना सखोल असे मार्गदर्शन केले त्याचबरोबर माणुसकी जपावी हा मंत्रही दिला. त्यांनी त्याच्या काही रचना विद्यार्थ्यांना ऐकवल्या. विद्यार्थ्यांनीही स्वतः लेखन केलेल्या कथा, कवितांचे सादरीकरण केले. व उपस्थितांची वाहवा मिळवली.त्याचबरोबर साहित्यातून मांडले जाणारे अनेक विषय यावर शाळेचे मुख्याध्यापक श्री. राजाराम गायकवाड सर व उपशिक्षिका रंजना सानप मॅडम यांनी चर्चा घडवून आणली. मुलांनी लेखकाची मुलाखतही घेतली. ज्येष्ठ लेखक श्री.सोपानराव शिंदे सर यांनी आपली स्वालिखित १४ पुस्तके शाळेच्या ग्रंथालयास भेट दिली. या उपक्रमाचे केंद्रप्रमुख श्री.रफिक मुलांनी साहेब, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्षा सौ. अमृता मोहिते, शाळा व्यवस्थापन समिती सर्व सदस्य पालक यांनी भरभरून कौतुक केले.




# ''तू जहाँ जहाँ चलेगा''

**ज्योतिर्मय साहित्य**

काही नाती शब्दांनी जपावी लागत नाहीत; ती जाणिवेच्या पातळीवर जपली जातात.

''तू जहाँ जहाँ चलेगा'' हे गीत अशाच नात्याची गोष्ट सांगतं. जिथे प्रेम कसलाही हट्ट करत नाही, बंधनं घालत नाही, तर फक्त सोबत देतं.

सावली हे या गीताचं मध्यवर्ती प्रतीक आहे. सावलीला स्वतःचं वेगळं अस्तित्व नसतं , ती आपल्यामुळेच असते. पण तरीही ती आपल्याला कधीच सोडत नाही. आपण चालतो, ती चालते. आपण थांबलो, ती थांबते. प्रकाश असेल तर ती स्पष्ट दिसते; अंधार असेल तर ती दिसत नाही; पण असते मात्र कायम. प्रेमाचं स्वरूपही असंच असावं, असा संदेश हे गीत देतं.

या गाण्यातील प्रेम आक्रोश करत नाही, रडगाणं गात नाही. उलट ते धीर देतं.

''मी जर दूर गेले तरी दुःखी होऊ नकोस'', ही भावना किती उदात्त आहे !

यात मालकीभाव नाही, तर समजूत आहे. यात असुरक्षितता नाही, तर विश्वास आहे.

अश्रूंचा उल्लेख जिथे येतो, तिथे प्रेमाची खरी ओळख दिसते.

तुझ्या डोळ्यात आलेत
अश्रू मला पुसायचे आहेत
म्हणजेच तुझं दुःख माझं
आहे. नात्याची खरी
ताकद ही इथेच दडलेली
आहे.

हे गीत आपल्याला शिकवतं की प्रेम म्हणजे सतत जवळ राहणं नव्हे; प्रेम म्हणजे जाणिवेत कायम राहणं. कोणी आपल्या सोबत नसतानाही त्याची साथ जाणवत राहिली, तर तेच खरं प्रेम.

कदाचित म्हणूनच हे गीत काळाच्या पलीकडे जाऊन आजही मनाला भिडतं.

कारण प्रत्येकाच्या आयुष्यात अशी एखादी सावली असते जिची साथ शब्दांत सांगावी लागत नाही, ती फक्त अनुभवावी लागते.

प्रेम ही एक सुंदर भावना आहे,
जी दोन हृदयांना कायम जोडून ठेवते.

ही अशी जाणीव आहे की
ती शब्दांत पूर्णपणे सांगता येत नाही
ती फक्त मनाने अनुभवायची असते.

मनोरंजन
सविता कारंजेकर (मो)९९२२८९४८८३

गीत- तू जहाँ जहाँ चलेगा
स्वर - लता मंगेशकर
गीतकार - राजा मेहदी अली खान
संगीत - मदनमोहन
चित्रपट - मेरा साया



# उतराई

**ज्योतिर्मय साहित्य**

गावाच्या रस्त्यावर डीजेंचा दणदणाट सुरु होता. एका उघड्या जीपमध्ये रंगा पैलवान गळयात माळा व हातात एक गदा घेऊन रुबाबदारपणे उभा होता. प्रत्येकजण रंगा पैलवानाचे स्वागत करीत होते. कारण त्यांनी पंचक्रोशीतील जत्रेमध्ये नावाजलेली कुस्ती मारली होती. नामांकित पैलवानाला चितपट करुन रंगा वाढ पैलवान ठरला होता. त्याने आपल्या गावाचे नांव उज्वल केले. पंचक्रोशितील आखाड्यामध्ये कुस्तीचे डाव व त्यातील इरस राष्ट्रीय खेळापेक्षा जास्तीचे असते. जशी शंकरपटामध्ये तशीच कुस्तीमध्ये असते. गांवोगावीचे पैलवान अशा जागांवर आपली शक्ती दाखवतात. वाढ कुस्ती खेळणारे मोजके पैलवान असतात. त्यात जिंकणारा मानकरी ठरतो. असेच रंगा पैलवानाने वाढ कुस्ती खेळून आपल्या गावाची एक दैदिप्यमान परंपरा वाढवली होती. ग्रामस्थांनी त्यांच्या विजयाचा गुलाल उधळला आणि गावाच्या शिवेपासून ढोल ताशांच्या गजरामध्ये गावापर्यंत मिरवणूक काढून स्वागत केले. गावातील त्यांच्या बिरादरीमध्ये मोठा जल्लोष झाला. लोक भावभावकीचे हेवेदावे विसरुन गावातून रंगा पैलवानाचे खुल्या मनाने स्वागत केले. गांव पुढारी या कार्यक्रमासाठी पुढे सरसावले. कार्यक्रम पार पडला.

त्यानंतर सात-आठ दिवसाचा काळ लोटला तरी विविध ठिकाणी रंगा पैलवानाचे सत्कार समारंभाचे कार्यक्रम सुरुच होते. घरातील मंडळी आनंदी होती. नातवाने पैलवान व्हावे असे स्वप्न पाहणाऱ्या आजोबांची छाती अभिमानाने फुगुन आली होती. या विजयाची धुंदी रंगा वर चढली होती. त्या दिवसापासून रंगा पैलवानाचा रुबाब वाढला होता. त्याच्यासमोर गावात कुणीही शक्तीशाली राहीला नव्हता. त्या बळाचा गर्व त्यास झाला होता. त्यामुळे गावात फिरताना सुध्दा तो फुगीर छातीने आपल्या शक्तीचा दर्प घेऊन फिरत होता. रंगा पैलवानाच्या विजयाचे आठवडाभर भरपुर कोडकौतुक झाले परंतु त्यांच्या विपरीत वागण्याने हळूहळू त्याच्याबद्दल निराशा होऊ लागली. लोकांमध्ये त्यास चढलेल्या फुगीरपणाची चर्चा होऊ लागली. परंतु त्याच्या शक्ती आणि बळापुढे कुणाची बोलण्याची हिंमत होत नव्हती. रंगाची आजी मात्र पहिल्या दिवसापासून कसल्याही प्रकारचा आनंद व्यक्त न करता शांत मुद्रेने त्याच्या बदलत्या स्वभावाचे भावचित्रण टिपत होती. ही गोष्ट पैलवानाच्या सुध्दा लक्षात येत होती परंतु विजयाची धुंदी त्याकडे लक्ष वेधु देत नव्हती. आठवडाभराचा काळ लोटल्यानंतर पाठीमागील गर्दी कमी झाली आणि आजीच्या त्या गंभीर मुद्रेकडे रंगाचे लक्ष वेधले गेले. एका दुपारच्या शांत वेळी आजी बसली असताना रंगाने आजीला तिच्या गंभीरतेचे कारण विचारले. रंगा म्हणाला या विजयाचा आनंद तिला झाला नाही का. स्वत:च्या गावाव्यतिरिक्त पंचक्रोशीमध्ये सत्कार झाले परंतु आजी का नाराज याचे उत्तर त्यास मिळत नव्हते. ते कारण विचारण्यासाठी तो बसला आणि आजीला तिच्या शांततेचे कारण विचारले.

माधव सूर्यवंशी माकणीकर
मो. 95278 53953

आजी म्हणाली की कितीही यशाच्या शिखरावर पोहोचले तरी सुध्दा कांही गोष्टीची उतराई होणे गरजेचे असते. माणसांनी त्या यशाची पहिली पायरी कोणती या गोष्टीची सदैव जाणीव ठेवायला हवी. आजीच्या त्या शब्दाची जाण रंगा पैलवानाला झाली नाही. परंतु आजीने ती फोड करुन सांगितली. पैलवानकी शिकताना त्या गावातील एका पैलवानाने रंगाला कुस्तीचे धडे शिकविले. त्याने एक युवक पैलवान तयार केला. त्यांच्या हातात, मनगटात बळ निर्माण केले, त्याचा खुराक सांभाळणारी माणसं, सुरुवातीच्या काळात त्यास गावोगांवी फिरवणारे त्याचे सहकारी, एक मुलगा पैलवान व्हावा म्हणून आपल्या हिस्स्याचा वाटा देणारी त्यांची भावंडं याचा विसर रंगा पैलवानाला पडला ही गोष्ट आजीच्या मनाला लागली होती. यश प्राप्त झाल्यानंतर बाहेर शंभर लोक जुडतात परंतु अपयशाच्या काळात सदैव सोबती राहणारे लोक यश मिळाले की कुठेतरी मागे पडतात, पैलवानाला ही जाणीव राहीली नाही याची खंत आजीला वाटत होती. त्यामुळे आजी आपलं मौन धारण करुन राहीली होती.

रंगा पैलवानाला या चुकीची जाणीव झाली. त्यांनी आपल्या जुन्या सवंगडयांना, बालवयातील कुस्तीपटुंना, आखाडयाच्या गुरुजींना बोलावून त्यांनी प्रथम त्यांचा सत्कार सोहळा केला. त्या सर्वांमुळे यशाचे शिखर गाठले हे रंगाने प्रांजळपणाने व्यक्त केले. मनावरील दडपणाचे ओझे त्यांनी कमी केले. केलेल्या उपकाराची परतफेड म्हणण्याऐवजी उतराई होण्याचा मनाचा मोठेपणा पैलवानाने दाखवला. तेंव्हा आजीच्या चेहऱ्यावरील हास्य फुलले. पैलवानाने वाढ कुस्ती जिंकल्याचा सोहळा आजीच्या दृष्टीने आज कृतार्थ ठरला.

उपकारातून उतराई होण्याबद्दल संत तुकाराम महाराज यांनी सुंदर अभंगरचना केली आहे.

**(क्रमशः)**

# झाडीपट्टी रंगभूमीचे नटसम्राट पद्मश्री डॉ. परशुराम खुणे

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

भारतातील सर्वोच्च नागरी सन्मानाचा बहुमान त्यांच्या रूपाने पहिल्यांदाच झाडीपट्टी कलावंतांना प्राप्त झाल्याचा आनंद रसिक प्रेक्षक अभ्यासकांना निश्चितच आहे.

झाडीपट्टी रंगभूमीचे ज्येष्ठ आणि श्रेष्ठ कलावंत विनोदाचे बादशहा, मागील पाच दशकांपासून झाडीपट्टी रंगभूमीवर आपल्या अभिनय क्षमतेने नाममुद्रा कोरणारे, रसिक प्रेक्षकांच्या गळ्यातील ताईत बनलेले नटसम्राट म्हणजेच डॉ. परशुराम खुणे होय. गडचिरोली जिल्ह्यातील गुरनोली येथे २२ फेब्रुवारी १९५२ ला जन्मास आलेल्या या कलावंताने झाडीपट्टीतील विविध भागात नाट्यप्रयोगा बरोबरच कर्तुत्वाने आपली उंची राज्य, राष्ट्रीय स्तरापर्यंत पोहोचवली आहे. सधन शेतकरी कुटुंबात जन्माला आलेल्या परशुराम खुणे यांनी वैद्यकीय शिक्षण घेतल्यानंतरही नाट्य क्षेत्रातच अधिक रस ओतला आहे. आपल्या आजूबाजूच्या परिसरात असलेली अंधश्रद्धा नष्ट व्हावी यासाठी अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्यही त्यांनी सामाजिक भान ठेवत केलेले आहे.

नुकतेच महाराष्ट्र सरकारच्या वतीने आयोजित शेतकरी अभ्यास युरोप दौऱ्यात सहभागी झाले आहेत. स्विझर्लंड, पॅरिस यासारख्या भागातील शेतकऱ्यांच्या वैभव संपन्नतेचे अवलोकन करीत आहेत. विविध सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक कार्यात आपल्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीने त्यांनी ठसा उमटवला आहे. ग्रामीण झाडीपट्टीतील प्रेक्षकांना त्यांच्याच शैलीत प्रगटीकरण करीत अढळ स्थान पद्मश्री डॉ. खुणे यांनी निर्माण केले आहे.

डॉ. परशुराम खुणे यांनी कॉमेडी, सामाजिक, कौटुंबिक, ऐतिहासिक, धार्मिक, ज्वलंत विषयावरील अशा विविध अंगी नाटकात वेगवेगळ्या भूमिका साकारले आहेत. त्यात प्रामुख्याने चरित्रप्रधान व विनोदी भूमिकांना रसिकांनी कायम स्मरणात ठेवले आहे. म्हणूनच झाडीपट्टीचा दादा कोंडके असे नामाभिधान अथवा ओळख या नाट्य कलावंतांच्या अष्टपैलू कर्तृत्वामुळे प्राप्त झाली आहे.गावातील सांस्कृतिक वातावरण व घरची कौटुंबिक पार्श्वभूमी यामुळे दंडारीतून हौशी कलावंत म्हणून त्यांना नाट्य क्षेत्रात पदार्पण केले.नवरगाव येथे शिक्षण घेत असताना बालाजी पाटील बोरकर यांच्या व्यंकटेश प्रासादिक नाट्य मंडळाच्या माध्यमातून दरवर्षी १६ जानेवारीला नाटके होत असत. बालाजी पाटील बोरकर, सुधाकर जोशी, जयमातला



शिलेदार या दिग्गजांच्या सहवासात परशुराम खुणे यांच्या अभिनय क्षमतेला तेज प्राप्त झाले. तंट्या भिल्ल या नाटकात त्यांना ऐनवेळी सोन्या या मुलाचे पात्र साकारण्याची संधी मिळाली आणि डॉ. जोशी, पुष्पा पवार, वसंत पवार यासारख्या श्रेष्ठ कलावंतांच्या सोबतीने अभिनयाची चुणूक दाखवता आली.लग्नाची बेडी या नाटकातील हॉटेल मॅनेजरची त्यांची भूमिका विशेष गाजली. या विनोदी भूमिकेतील वैशिष्ट्यपूर्ण संवाद व देहबोलीच्या अभिनयामुळे चित्रकार धनंजय नाकाडे आणि बालाजी पाटील बोरकर यांनी त्यांना विनोदी कलावंत म्हणून नावारूपास आणले. पुढे व्यंकटेश प्रसादिक मंडळाच्या विविध विनोदी भूमिका करण्याची संधी परशुराम खुणे यांना प्राप्त झाली. प्रामुख्याने दिवा जळू दे सारी रात या नाटकातील मदन या भूमिकेने त्यांना लौकिक प्राप्त झाला. येळकोट मल्हार मधील खाशाबा, सिंहाचा छावा मधील शंकर, लग्नाची बेडी मधील अवधूत , तंट्या भिल्ल मधील जेलर यासारख्या भूमिका परशुराम खुणे यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण अभिनय क्षमतेने गाजविल्या आणि रसिकप्रिय ठरल्या. स्वर्गातील स्वारी मध्ये भद्राक्ष, एकच प्याला मधील तळीराम, लावणी भूलली अभंगाला मधील गणप्या या भूमिका आजही झाडीपट्टीतील प्रेक्षकांच्या स्मरणात आहेत. सातशे पेक्षाही अधिक प्रयोग झालेले लोकप्रिय नाटक मरीमाईचा भुत्या मधील वनरक्षक, एक नार तीन बेजार मधील बहिरा, नाथ हा माझा मधील बारक्या, मी बायको तुझ्या नवऱ्याची मधील दिनू असे अनेक पात्रे त्यांनी जिवंत साकारली. धनंजय नाकाडे यांनी म्हणूनच एकूण त्यांचीअभिनयक्षमता पाहून झाडीपट्टीचा सोंगाड्या ज्युनिअर दादा कोंडके ही पदवी त्यांना बहाल केली. किंबहुना त्यांनी दिलेला भेट स्वरूपातील कोट व शाबासकीची थाप पुढील वाटचालीस प्रेरणादायी ठरली.

प्रा. डॉ. राजकुमार मुसणे,
गडचिरोली मो. 94236 39532

सडपातळ शरीरयष्टी, प्रसन्न मुद्रा, भारदस्त आवाज, जबरदस्त पाठांतर व परफेक्ट टाइमिंग यामुळे त्यांच्या भूमिका अजरामर ठरल्या.डॉ. परशुराम खुणे यांनी अभिनय करताना कधीच कोणाची नक्कल केली नाही. सभोवतालचे इरसाल नमुने नेहाळत त्यांच्या स्वाभाविक बोलण्यातील संवाद हेरून त्याचा पालपद म्हणून उपयोग करत प्रेक्षकांना हसविण्यात त्यांचा हातखंडा होता. किंबहुना इतर कलावंतांना सुद्धा कुणाचे नक्कल न करतां आपले वेगळेपण सिद्ध करण्याची सक्त ताकीद देतात.

सतत पंधरा वर्षे ते सरपंच म्हणून गुरनोलीच्या राजकारणात सक्रिय राहिले पाच वर्षे उपसरपंच म्हणून कार्य करत त्याने गावाचाही कायापालट केला. त्यांच्या एकूण कर्तृत्वामुळे त्यांना महाराष्ट्र शासनाचा शेतीनिष्ठ पुरस्कार, कला गौरव, जादूगर पुरस्कार, स्मिता स्मृती पुरस्कार, झाडीबोली साहित्य परिषदेचा पुरस्कार, झाडीपट्टी नाट्य संमेलनाचे अध्यक्षपद, अखिल भारतीय अकादमीचे अध्यक्ष, कलाभूमी पुरस्कार, जिल्हा गौरव पुरस्कार, छोटा गंधर्व स्मृति नाट्य पुरस्कार, ज्येष्ठ रंगकर्मी पुरस्कार, जीवनगौरव पुरस्कार, समाजभूषण पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी गौरवांकित करण्यात आले आहे. निरंतर झाडीपट्टी रंगभूमीची आराधना करणाऱ्या समर्पित कलावंतांची या पुरस्कारामुळे त्याच्या कार्याची योग्य दखल घेतली गेली.

नाट्य क्षेत्राबरोबरच त्यांनी रंग माझा वेगळा पहिले पाऊल जीवनाचे निबंध यासारख्या चित्रपटात ही भूमिका केल्या परंतु नाटक आणि चित्रपटांमध्ये त्यांना खूप फरक जाणवतो चित्रपटापेक्षा नाटकांमध्ये प्रत्यक्ष प्रेक्षकांसमोर जिवंतअभिनय करताना अधिक आनंद समाधान मिळते, ते व्यक्त करतात. झाडीपट्टी रंगभूमी संपन्न व समृद्ध करणारे जेष्ठ रंगकर्मी डॉ. परशुराम खुणे हे आता अमृत महोत्सवी वर्षाकडे वाटचाल करीत आहेत त्यांचा एकूणच कलाप्रवास ऐतिहासिक व प्रेरणादायी स्वरूपाचा आहे. त्यांच्या एकूणच कार्यकर्तृत्वाला सलाम. या निमित्ताने डॉ. परशुराम खुणे यांना दीर्घआयुरारोग्य लाभो, हीच वाढदिवसाच्या निमित्ताने सदिच्छा..! ***

# मराठी भाषा गौरव दिना निमित्ताने

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

महाराष्ट्रात मराठी शाळा टिकवण्यासाठी प्रयत्न करावा लागतो हीच मोठी शोकांतिका आहे.... मराठी शाळेतच दर्जेदार शिक्षण आणि सर्व सुविधा पुरवा..त्या का नाही पुरवीत.? इंग्रजी माध्यमांच्या खाजगी शाळांनी जिल्हा परिषदेच्या किंवा महापालिकेच्या सरकारी प्राथमिक शाळांना सुरुंग लावला आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही

इंग्रजी जरूर शिका पण त्यासाठी मराठीचा अव्हेर करु नका. गेल्या काही वर्षात आपली मुलं इंग्रजी माध्यमातून शिकावित हा दृष्टिकोन फारच वाढत चाललाय. त्यामुळेच मुलांवर सुरुवाती पासूनच इंग्रजीत ओळख होत असल्याने मुले आता मराठीत बोलायला अडखळून लागले आहेत. त्यांच्या शिक्षणाची सुरुवातच अ.आ.ई. ऐवजी ए.बी. सी.डी. ममी-पप्पा, माँम-डँड पासून होते. इंग्रजी माध्यम शाळेत मुलं शिकतात ही आई वडिलांना प्रतिष्ठेची गोष्ट वाटू लागली आहे.आणि हीच मराठी साठी धोक्याची घंटा आहे, म्हटल्यास खोटे ठरणार नाही. येणारी पिढीच जर मराठीचा वारसा जपणार नसेल तर कसे होणार.

आज ग्रामीण भागातील मराठी शाळांची दशा आहेत हे आपण बघतोच आहे. जो तो आपल्या मुलांना इंग्लिश मीडियम शाळांमध्ये टाकण्यासाठी आग्रही आहेत. आहेत.लाखाच्या वर पैसे भरुन प्रवेश मिळवतात. मराठी शाळा बंद पडताहेत. प्राथमिक शिक्षण हाच मराठीच्या संवर्धनाचा पाया आहे. कारण याच वयात शिक्षण आणि संस्कार या गोष्टी मुलांवर होणे आवश्यक असते. परंतु इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये प्रवेश घेण्याचे आकर्षण मुलांबरोबर पालकांतही मोठ्या प्रमाणात आढळून येते, आणि त्यामुळे ज्याला आपण मराठीचा पाया म्हणतो त्या प्राथमिक शाळा बंद होण्याचे अवस्थेत आहेत. एकूणच सरकारी प्राथमिक शाळेची अवस्था अतिशय वाईट झाली आहे. त्या शाळा बंद करणे हा एकमेव मार्ग नसून त्यात सुधारणा घडवून आणले हे तितकेच महत्त्वाचे आहे हा विचार करायला हवा आहे.

त्याचबरोबर सरकारी शाळेच्या संदर्भात अनेक गोष्टी आपल्याला सोशल मीडियातून बघायला वाचायला मिळतात मग त्यात, विद्यार्थी आहे पण शिक्षक नाही, शिक्षक आहे पण विद्यार्थी नाही, दोन्ही आहे पण शाळेच्या इमारतीची दुरावस्था आहे अशी कारणे असतात. त्याचबरोबर आता बऱ्याच शाळांमध्ये शिक्षकांच्या नैतिकतेचा प्रश्न निर्माण झाला आहे. ज्याला आपण सरस्वती मंदिर म्हणतो ती ही शाळा जिथे शिक्षणाबरोबर संस्काराची अपेक्षा आपण करतो. शिक्षक हेच गुरु असतात म्हणतो, अशा काही शाळांमध्ये शिक्षक दारू पिऊन शाळेत येणे दारू पिऊन वर्गामध्ये नाच करणे कुठे कुठे तर शाळेमध्ये शिक्षक झोपून राहिल्याचे सुद्धा व्हिडिओ समोर आले आहेत. कळस म्हणजे आता तर काही शाळांमध्ये शिक्षकांचे विद्यार्थिनी बरोबरचे गैरवर्तन,अल्पवयीन मुलींबरोबर लैंगिक चाळे, प्रसंगी बलात्कार झाल्याच्या घटनाही आपण वाचल्या आहेत.खाजगी




शाळांमध्ये ही अशा घटना घडतात. अशावेळी शिक्षण विभाग झोपला आहे काय ? किंवा अशा शिक्षकांवर कडक कारवाई करून त्याचे अहवाल का सादर होत नाही ? हाही प्रश्न विचारला जात आहे. मराठी शाळांची परिस्थिती चिंताजनक असून, इंग्रजी माध्यमाच्या आकर्षण, मराठी माध्यमातून शिकवण्याला कमी लेखले जाणे, ही प्रमुख आव्हाने आहेत. शहरी आणि निमशहरी भागात पालकांचा इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे कल वाढल्याने मराठी शाळांमधील

विद्यार्थ्यांची संख्या वेगाने कमी होत आहे.मराठी शाळांचे शिक्षक सुध्दा आपल्या मुलांना सरकारी मराठी शाळांमध्ये न घालता इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश घेतात. ते स्वतःच्या शाळेत शिक्षण देतात तर त्यांचा त्यांच्या शिकवण्यावर भरोसा नाही का ?

अनेक सरकारी मराठी शाळांमध्ये चांगले वातावरण असते. नाही असे नाही. पण अशा काही शाळांच्या शिक्षकांच्या गैरवर्तवणूकीने इतर मराठी शाळाही बदनाम होतात.होत आहेत.

आजच्या आधुनिक तंत्रज्ञान आणि स्पर्धात्मक परीक्षांच्या युगात मराठी शाळांनी दर्जेदार शिक्षण देण्याची गरज आहे. व्यवहारात आणि शिक्षणात मराठीचा वापर वाढवणे, ही काळाची गरज आहे. हाच विचार एका साहित्य संमेलनाचे समारोपाची वेळी न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर यांनी त्यांच्या भाषणात प्रामुख्याने मांडला होता.

रिक्षा-टँक्सीवाला मराठीत संवाद साधत तुमच्याशी बोलतो. आपण उगीचच त्याच्याशी हिंदीतून बोलतो . छोट्या छोट्या गोष्टीतून आपण खूप काही करु शकतो.काय करु शकतो,मराठीत खूप मोठी साहित्य संपदा आहे. हजारांचे संख्येने पुस्तके, शेकडो दिवाळी अंक प्रसिद्ध होतात. यातले आपण किती वाचतो.वर्तमानपत्र किती जण वाचता? कुठल्या वाचनाला प्राधान्य देतो.वर्षभरात मराठीतल काही वाचण्याचा संकल्प करा. किमान पाच सात पुस्तके वाचा. वाचून जवळच्याला प्रवृत्त करा. काही चांगले ग्रंथ खरेदी करा. वाढदिवसाला, लग्न समारंभात पुस्तकांची भेट द्या.इंग्रजी माध्यमातून मुलाच्या शिक्षण असेल तरी त्यांना मराठीपासून तोडू नका. त्यांना मराठीतली चांगली चांगली पुस्तके वाचायला द्या, त्याच्यामध्ये आवड निर्माण करा.

निरनिराळ्या कार्यालयात कार्यालयीन कामकाज मराठीत व्हावे म्हणून शासनाने निर्णय घेतले आहे. सक्तीचे केले आहे.पण त्यातही प्रगती नाही.संपूर्ण महाराष्ट्रात सर्वच ठिकाणच्या पाट्या मराठीतच हव्यात हा आग्रह धरला पाहिजे.फक्त पाट्या मराठीत करून भागणार नाही. महाराष्ट्रात रहिवास करावयाचा त्याला मराठी भाषा अवगत असावी. त्यासाठी काहीतरी धोरण असावे.

कोणत्याही भाषेचे संगोपन होण्यासाठी तिचा वापर ज्ञानभाषा म्हणून ज्ञान संवर्धना साठी होणे आवश्यक आहे. आणि ज्ञानावर आधारित सर्व क्षेत्रांमध्ये मराठी भाषेचा वापर करण्यासाठी मराठी ही ज्ञानभाषा करण्यासाठी राज्य सरकार वचनाबद्ध असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्धा येथील साहित्य संमेलनात बोलले होते.

. सगळेच मराठी भाषा संवर्धनाविषयी विचार मांडतात.. ही जबाबदारी आता दोन्ही पातळीवर होणे आवश्यक आहे. शासनाने त्यांच्या बाजूला शक्य आहे ते आणि आवश्यक ते करायला हवे आणि आपल्या सगळ्यांच्या पातळीवर आपण जे काही करायला हवे जास्तीत जास्त मराठीचा वापर बोलण्यात, लिखाणात, कसा होईल हे बघायला हवे.

ज्ञानभाषा म्हणजे जी विज्ञान तंत्रज्ञान शिक्षण आणि विशेषतः उच्च शिक्षण मूलभूत संशोधन उद्योग वाणिज्य विधी व न्याय प्रशासन आधी प्रगतव्यवहार क्षेत्रात पूर्ण क्षमतेने व गुणवत्ता पूर्ण रितीने समाजातील सर्व घटकांकडून ती वापरली जाते, तसेच बुद्धीवर्ग आपल्या क्षेत्रातील विचार मंथनासाठी तिचा वापर करतो अशी भाषा.

आता मराठीला अभिजीत भाषेचा दर्जा प्राप्त झाला असला तरी ती ज्ञानभाषा कशी होईल आणि टिकून राहील याचा विचार महत्त्वाचा आहे आणि ते सर्वस्वी आपल्यावर अवलंबून आहे. कारण वाचण्यातून लिहिण्यातून बोलण्यातून आणि दैनंदिन व्यवहारातून हे शक्य आहे. नुसत्याच गप्पा करून आणि संमेलनातून शक्य नाही. संमेलन होत रहातील, पुस्तक मोहोत्सव होत राहतील. त्यातून फार काही साध्य होत नाही हा नेहमीचाच अनुभव आहे. आता मराठी भाषा गौरव दिन आणि त्याच वेळेला विश्व मराठी साहित्य संमेलन नाशिक नगरीत संपन्न आहे. त्यावेळी मराठी भाषा मंत्री तसेच शिक्षण सांस्कृतिक मंत्री यांनी यासंदर्भात योग्य तो विचार करावा ही अपेक्षा आहे. नाहीतर सरकारी मराठी शाळा हा विषयच यापुढे बंद होण्याच्या मार्गावर आहे असे म्हणावे लागेल.

मराठी भाषा टिकवण्यासाठी आणि पुढे नेण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. आपण आपल्या दैनंदिन जीवनात जास्तीत जास्त मराठीतून संवाद साधला पाहिजे, मराठी ग्रंथ वाचले पाहिजेत आणि नव्या पिढीला मराठी भाषेचे महत्त्व समजावून सांगितले पाहिजे. ह्या वर्गावर म्हणजेच बालवयातच मराठी भाषेचे संस्कार झाले तर आणि तरच मराठी भाषा टिकणार आहे. वाचा..बोला..लिहा.. शिका.. शिकवा.. टिकवा मराठी. हीच आवश्यकता आहे, आणि हाच मराठी भाषेचा गौरव आहे.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559